<u>निशाणी क्रमांक १ वर आदेश</u>

(दिनांक १४.०८.२०२१, रोजी नि.क्र.१ वर,आदेश )

प्रस्तुतचा दावा हा सन २०१९ चे आहे. दाव्यात एकूण ३ वादी आणि ३ प्रतिवादी आहेत. दाव्यामध्ये तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश नि.क्र. ५ अन्वये दाखल आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांचा खुलासा अभिलेखावर दाखल आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी सुध्दा लेखी जबाब दाखल केला आहे. त्यानंतर अभिलेखावर नि.क्र. २८ अन्वये अर्ज दाखल करण्यात आला. नि.क्र. २९ दस्त यांदी सोबत रजूबाई पंडीत सोनवणे, यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर नि.क्र. ३१ अन्वये वादी यांच्या तर्फे पुरसीस दाखल करण्यात आली की, प्रतिवादी क्र. ३ या मयत असून ती अविवाहीत होती, तिला कोणीही वारस नाही. प्रतिवादी क्र. ३ चे नांव रंजना बाप पंडीत सोनवणे, असे आहे, मृत्यू प्रमाणपत्रावर नांव रजूबाई पंडीत सोनवणे, असे आहे. आज रोजी वादी यांच्या तर्फे पुरसीस नि.क्र. ३३ व ३४ दाखल करण्यात आली की, प्रतिवादी क्र. ३ ही मयत झाली आहे. तिला कोणी वारस नाही त्यामुळे तिचे नांव दाव्यातून आणि नि.क्र. ५ च्या अर्जातून वगळण्यात यावे.

त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ ह्या मयत झाल्या असे वादी यांचे कथन आहे आणि त्यांना प्रकरणाातून त्यांचे नांव कमी करावयाचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ यांच्या विरुध्द कार्यवाही सुरू ठेवणे योग्य नाही. सबब आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

- प्रतिवादी क्र. ३ रंजना बाप पंडीत सोनवणे, यांच्याविरुध्दची दाव्यातील कार्यवाही ही समाप्त करण्यात येते. (The case is therefore abated as against the deceased defendant No. 3 )

साक्री
दिनांक १४.०८.२०२१.

सही/-
रा.भा.डोळे
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक १४.०८.२०२१.

स्वाक्षरीत/–
लघुलेखक श्रेणी –३